# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 05 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०५ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- ‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजने’च्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेपाला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार
- महिला बचतगटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या यशस्विनी ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म चं उद्घाटन
- तांत्रिक अडचणींमुळे जालना तसंच परभणी जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानदारांचा ई–पॉस मशीनला विरोध

आणि

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज, बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनचा कांस्यपदकासाठी सामना तर टेबल टेनिसमध्ये भारतीय महिला संघ उपांत्यपूर्व फेरीत दाखल

****

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजने’च्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करता येणार नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. ही योजना सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय असल्याचा आरोप करत नवी मुंबईतील चार्टर्ड अकाऊंटंट नावेद मुल्ला यांनी या योजनेविरोधात जनहित याचिका दाखल केली होती. मात्र ही योजना म्हणजे सरकारनं अर्थसंकल्पाच्या अंतर्गत घेतलेला निर्णय आहे, त्याला आव्हान कसं देता येईल, असं म्हणत न्यायालयानं या योजनेच्या विरोधात दाखल याचिका फेटाळून लावली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे या योजनेअंतर्गत १४ ऑगस्टला मिळणाऱ्या पहिल्या हप्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळल्याबद्दल महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी न्यायालयाचे आपल्या ट्वीटर खात्यावरुन आभार मानले आहेत. केवळ विरोध म्हणून या योजनेला देण्यात आलेले आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळल्याने या योजनेची विश्वासार्हता अधिकच वाढली असल्याचं तटकरे यांनी नमूद केलं.

शिवसेना सचिव आणि प्रवक्त्या डॉ.मनीषा कायंदे यांनी, न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे महायुती सरकारच्या लोकाभिमुख योजनेवर शिक्कामोर्तब आणि विरोधकांना चपराक असल्याचं म्हटलं आहे.

****

महिला बचतगटांसाठीच्या यशस्विनी ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचं आज महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ऑनलाइन उद्‌घाटन करण्यात आलं. महिला बचतगटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हा पथदर्शी उपक्रम सुरू करण्यात आला आहे, यामुळे महिला बचत गटांना आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग उपलब्ध होईल असं तटकरे यावेळी म्हणाल्या.

****

अर्थसंकल्पात दुग्धव्यवसायाला सहाय्य करण्यासाठी उपाययोजनांची गरज अहमदनगरचे खासदार नीलेश लंके यांनी आज लोकसभेत व्यक्त केली. पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यपालन विभागाच्या अनुदान मागण्यांवरच्या चर्चेत त्यांनी या विषयाकडे लक्ष वेधलं. दुधाच्या उत्पादनखर्चावर बाजारभाव ठरावा, दुधाला किमान हमीभाव मिळावा, तसंच आवश्यक पायाभूत सुविधांसाठी वाढीव निधीसह अन्य उपाययोजना करण्याची मागणी लंके यांनी केली.

****

देशभरात आतापर्यंत ५० लाखांहून अधिक कामगारांनी प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेत नावनोंदणी केली आहे. केंद्रीय श्रम आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. यामध्ये महाराष्ट्रातल्या सहा लाखावर कामगारांचा समावेश असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील नागरिकांसाठी सरकार काम करत राहील असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. जम्मू काश्मीरमधलं कलम ३७० आणि ३५ -अ हटवून आज पाच वर्ष पूर्ण झाली, त्याबद्दल समाज माध्यमावरील एका संदेशात आपल्या भावना व्यक्त करत, मोदी यांनी हा राष्ट्राच्या इतिहासातील एक अविस्मरणीय क्षण असल्याचं नमूद केलं.

****

बांग्लादेशात उद्भवलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीमाना देत, देश सोडल्याचं वृत्त आहे. शेख हसीना यांच्या ढाका इथल्या निवासस्थानी शेकडो आंदोलकांनी घुसखोरी केली, त्यानंतर हसीना यांनी सुरक्षित स्थळी तात्पुरता आसरा घेत, सैन्यदलाच्या हेलिकॉप्टरने देश सोडल्याचं वृत्त बांग्लादेशातल्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे.

बांग्लादेशात १९७१ च्या युद्धातल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांना सरकारी नोकरीत आरक्षण देण्याला मोठ्या प्रमाणात विरोध होत असून, विद्यार्थी संघटनांनी देशव्यापी असहकार आंदोलन सुरु केलं आहे. पोलिस आणि आंदोलकांच्या चकमकीत आतापर्यंत शंभराहून अधिक लोक मारले गेले आहेत. या देशाच्या सैन्यप्रमुखांनी देशवासियांनी शांततेचं आव्हान केलं आहे.

दरम्यान, या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर भारतीयांनी बांगलादेशमध्ये जाऊ नये अशा मार्गदर्शक सूचना भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केल्या आहेत.

****

श्रावण महिन्याला आजपासून सुरुवात झाली. आज श्रावणी सोमवारनिमित्त ठिकठिकाणच्या महादेव मंदिरांमध्ये भाविक गर्दी करत आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरुळ इथल्या श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगासह हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ इथं तसंच बीड जिल्ह्यात परळी इथल्या वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिरातही भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. जालना इथं विविध शिवमंदिरात शिवभक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं. नाशिक जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथंही भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असून सकाळपासून महादेवाच्या दर्शनासाठी रांगा लागल्या आहेत.

****

जालना शहरासह जिल्ह्यात ई-पॉस मशीनमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे स्वस्तधान्य वाटपात अडचणी येत असल्यानं जालना शहरातल्या स्वस्त धान्य दुकानदारांनी आज ई-पॉस मशीन तहसील कार्यालयात आणून जमा केल्या. या मशीनचे सर्व्हर सातत्यानं डाऊन राहत असल्यानं दुकानदार आणि लाभार्थ्यांमध्ये वाद होत आहे. त्यामुळे रेशन दुकानदारांना त्यांच्या स्तरावर ऑफलाईन पध्दतीने धान्य वाटपाची परवानगी द्यावी, अशी मागणी स्वस्त धान्य दुकानदार महासंघाच्यावतीनं तहसीलदारांकडे करण्यात आली. मंठा, बदनापूर, परतूर या ठिकाणीही स्वस्त धान्य दुकानदारांनी ई-पॉस मशीन प्रशासनाला परत केल्या.

परभणी शहरातील स्वस्त धान्य दुकानदार संघटनांनी आज याच कारणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलं, ई पॉस मशीनवर तांत्रिक अडचणी येत असून, त्यामुळे नागरिकांना धान्य वितरण करण्यासाठी अडचणी येत असल्याची तक्रार या स्वस्त धान्य दुकानदारांनी केली आहे.

****

पूजा खेडकर प्रकरणानंतर राज्यातून दीडशे दिव्यांग प्रमाणपत्र बोगस असल्याची यादी आपल्याकडे प्राप्त झाली आहे, ही यादी आपण शासनाकडे पाठवली असून त्यांच्याविरोधात कारवाईची गरज, दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी इथं शेतकरी आणि कार्यकर्ता मेळाव्यासाठी आले असता ते पत्रकार परिषदेत बोलत होते. विधानसभेच्या आगामी निवडणुका शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नावर लढवणार असल्याचं कडू यांनी यावेळी सांगितलं.

****

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज, बॅडमिंटनपटू लक्ष्यसेनचा पुरुष एकेरीत कांस्यपदकासाठी सामना होणार आहे. तर ॲथलेटिक्समध्ये पुरुषांच्या तीन हजार मीटर अडथळांच्या शर्यतीत बीडचा अविनाश साबळे सहभागी होणार आहे. तर महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत किरन पहल सहभागी होईल. त्याशिवाय आज नौकानयन आणि टेबल टेनिसचेही सामने होतील. हॉकीमध्ये भारताचा उपान्त्य फेरीचा सामना उद्या होणार आहे. टेबल टेनिसच्या सांघिक प्रकारात भारतीय महिला संघ उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाला आहे.

दरम्यान, पॅरिस ऑलिम्पिकच्या सन्मानार्थ आज भारतीय टपाल विभागानं विशेष तिकिटांचा संच प्रकाशित केला. नवी दिल्लीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे तसंच युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय उपस्थित होते.

****

राष्ट्रवादी काँग्रेसची 'जनसन्मान' यात्रा येत्या ८ ऑगस्टपासून नाशिकच्या दिंडोरी इथून सुरू होणार आहे. प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यात्रेचा पहिला टप्पा उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भ असा असून हा टप्पा ३१ ऑगस्टला संपणार असल्याची माहिती तटकरे यांनी दिली.

****

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी प्राप्त अर्जांची ऑनलाईन छाननी प्रक्रिया लातूर जिल्ह्यात सुरळीतपणे सुरू आहे. प्रत्येक तालुकास्तरावर छाननी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर पंचायत समिती इथं आयोजित शिबिराला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भेट देऊन प्रक्रिया गतिमान करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

नाशिक जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातल्या मालधे इथं गिरणा नदीपात्रात कालपासून अडकलेल्या १५ मच्छीमारांची आज विशेष हॅलिकॉप्टरने सुटका करण्यात आली. मासेमारीसाठी गिरणा नदीपात्रात गेलेल्या या मच्छीमारांना पुर अचानक वाढल्याने नदीपात्रात मध्यवर्ती असलेल्या खडकावर आसरा घ्यावा लागला होता. आज सकाळी नाशिकच्या गांधीनगर इथल्या कॉम्बॅट आर्मी एव्हीएशन ट्रेनिंग स्कुलच्या लढाऊ वैमानिकांनी या खडकावर हेलिकॉप्टर उतरवत, मच्छीमारांना टप्प्याटप्प्याने नदीकाठावर आणून सोडलं.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यात काल रात्रीपासूनच पावसाचा जोर कमी होण्यास सुरूवात झाली आहे. सध्या गंगापूर धरणातून दोन हजार घनफुट प्रतिसेकंद, दारणा धरणातून ८ हजार ९४२ घनफुट प्रतिसेकंद तर कडवा धरणातून १एक हजार ४६२ घनफुट प्रति सेकंद वेगाने विसर्ग केला जात आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या नाथसागर धरणाची पाणी पातळी १५०० फुटांवर पोहोचली आहे. धरणातला जिवंत पाणीसाठा ३२३ पूर्णांक १८८ दशलक्ष घनफूट इतका झाला आहे. धरणामध्ये सध्या ६६ हजार ३६७ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक होत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****